Marketing and Publicity
Head Office
media@mahabank.co.in; cmmedia@mahabank.co.in

**प्रसिद्धीसाठी**

# बँक ऑफ महाराष्ट्रास मानाचा "टिम ऑफ द ईयर" अवॉर्ड

**पुणे, फेब्रुवारी** 17, 2020: बँक ऑफ महाराष्ट्रच्या कोषागार आणि आंतरराष्ट्रीय बँकिंग विभागास मानाचा "टिम ऑफ द ईयर" हा सन्मान प्राप्त झाला आहे. ईटी-नाऊ बिझनेस लीडर यांच्या तर्फे मुंबई मध्ये आयोजित एका कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए. सी. राउत आणि उप महाव्यवस्थापक श्री दिनकर संकपाळ यांनी लाईफ विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष श्री न्यूटन कोंडावेती आणि सह संस्थापक अध्यक्ष डॉ लक्ष्मी कोंडावेती यांच्या हस्ते चषक आणि प्रमाणपत्र स्वीकारले.

विविध क्षेत्रातील नामवंत सदस्यांचा समावेश असलेल्या ज्यूरीद्वारे विजेत्यांची निवड केली गेली होती. "टीम ऑफ द इयर" हा सन्मान उद्योग विश्वातील लक्षवेधी सन्मान असून 'कामगिरीचे मानांकन' या मापदंडावरून विजेत्याची निवड केली जात असल्याने हा सन्मान प्रशंसनीय आहे.

बँक ऑफ महाराष्ट्रच्या देशांतर्गत आणि देशाबाहेरील कोषागार या विभागाला यापूर्वी मान्यताप्राप्त आयएसओ 9001:2015 हा पुरस्कार गुणवत्तापूर्ण व्यवस्थापन सेवांसाठी दिला गेला आहे. बँकेच्या कोषागार आणि आंतरराष्ट्रीय बँकिंग विभाग प्रथमपासूनच पुढाकार घेऊन प्रगती पथावर रहात असून ही प्रदीर्घ परंपरा आताही राखली आहे. या विभागाने अनेकवेळा प्रमाणित निकाल दिलेले असून मागील अनेक वर्षांपासून बँकेच्या नफ्यासाठी मोठे योगदान दिलेले आहे. कोषागाराच्या व्यवहाराद्वारे वार्षिक आधारावर 20% वृद्धीचे उत्पन्न बँकेस मिळवून दिलेले असून ही बाब सार्वजनिक क्षेत्रातील इतर समकक्ष बँकांच्या तुलनेत अधिक उल्लेखनीय आहे.

कार्यक्रमास सहाय्यक सरव्यवस्थापक मुकेशकुमार सैनी आणि रूपेश बिस्वास, मुख्य व्यवस्थापक अभिषेक चौबे आणि राजेशकुमार यांची कार्यक्रमास उपस्थिती होती.




**(फोटोमध्ये) डावीकडून: श्री न्यूटन कोंडावेती, उप महाव्यवस्थापक श्री दिनकर संकपाळ, कार्यकारी संचालक श्री ए. सी. राउत आणि डॉ लक्ष्मी कोंडावेती**